वर्ष ४१ अंक ९

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
|| मराठी तितुका मेळवावा ||

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर २०२१

## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

“मेघ दाटले कोठुन न कळे
मनभर आल्या धारा
उत्कट ओल्या आठवणींचा
झरे अनावर पारा
दिन जे गेले, त्यांचे झाले
गहनगूढ आभाळ
बगळे होऊन झुलू लागली
शुभ्र क्षणांची माळ “...

हा लेख लिहायला घेतला आणि बाहेर सुरू असलेल्या पाऊसधारा गेल्या काही महिन्यातल्या अनेक आठवणी घेऊन आल्या आहेत. बघता बघता अर्ध वर्षं उलटून गेलं. कोविडच्या विळख्यातूनही जग हळूहळू बाहेर पडायला लागलंय. मोकळया हवेत, मोकळ्या आकाशाखाली जगण्याचे उत्सवी रंग पुन्हा खुणावू लागले आहेत आणि ‘लाइफ इज ब्यूटीफूल’ अशी ग्वाही देऊ लागले आहेत.

या उत्सवाचाच एक रंग म्हणजे ‘अटलांटिक सिटी, न्यू जर्सी’ येथे १० ते १४ ऑगस्ट २०२२ रोजी होऊ घातलेले आपले बृहन्महाराष्ट्र मंडळाचे (बृ. म. मं.- BMM) अधिवेशन. अहो, आपल्या घरचंच कार्य हे! तर ही लगीनघाई जोरात सुरू झालीय बरं का! त्याविषयी सविस्तर या अंकात पान तीन वर आहेच.
अधिक माहितीसाठी: https://bmm2022.org/
फेसबूक: https://facebook.com/bmm2022nj/
आपले कुटुंबीय आणि मित्रमंडळींसोबत अधिवेशनाचा अद्वितीय अनुभव घ्यायला जरूर या. आपल्या मराठीच्या या उत्सवाला आपण सगळे मिळून ऐतिहासिक, अविस्मरणीय बनवू या.

आपले इतर नैमित्तिक कार्यक्रमही नेहमीप्रमाणे धडाक्यात सुरू आहेत. ‘ताल से ताल मिला’ म्हणत बृ. म. मंडळाचे कराओके मंडळ गाण्यात रंगून गेलेलं आहे. मानसिक आरोग्यासाठी सुरू असलेल्या मालिकेत योगा, रेकी, आयुर्वेद, विषयांवरील व्याख्यान-सत्रे यशस्वीपणे पर पडली आहेत. ‘उत्तररंग’, ‘युवा’ या सत्रांनाही चांगला प्रतिसाद मिळाला. `लेखक तुमच्या भेटीला’- हा उपक्रमही लोकप्रिय आहे. साहित्यप्रेमी याची उत्सुकतेने वाट बघत असतात. कोविड काळातही आपल्या मराठी शाळेने ज्ञानदानाचे कार्य ऑनलाइन माध्यमातून अखंड चालू ठेवले आहे. ‘रेशीमगाठी’ संकेतस्थळावर २५०+ उपवर, वधूंची नोंदणी झाली आहे. लवकरच या लग्नेच्छूक वधूवरांचा मेळावा आयोजित करण्याची योजना आहे. तुमच्या घरी लग्नाळू मुले/मुली असल्यास, https://reshimgathee.bmmonline.org/ या संकेतस्थळावर जरूर नावनोंदणी करा.

कोविडच्या कठीण काळात सामाजिक भान ठेवत बृ. म. मंडळाने सुरू केलेल्या कोविड ‘हेल्पलाईन’चा लाभही अनेकांना घेता आला, याचे समाधान वाटते. ‘BMM नॉर्थ अमेरिका’ उपक्रमांतर्गत शिकागोमधील ७५ उत्साही कलाकार मिळून बसवलेले ‘येणारेय येणारेय’ हे धमाल विनोदी नाटक ऑगस्टमध्ये ऑनलाइन दाखवले, सुमारे १००+ लोकांनी हे नाटक बघितले आणि नावाजलेही.

आजवरच्या बृ. म. मंडळाच्या कामगिरीचा हा आढावा घेताना मन खरोखर अतिशय समाधानी आहे. परंतु याच टप्प्यावर अल्लमा इक्बाल यांचा शेर कायम मनात असतो,
‘सितारोंके आगे जहां और भी है। अभि इश्क के इम्तिहां और भी है।’
तेव्हा थांबून कसं चालेल, आता पुढचा टप्पा म्हणजे बृ. म. मंडळांच्या जागतिकीरणाचा उपक्रम चालू केला आहे. जपानचे मराठी मंडळ सहभागी होण्यांस उत्सुक आहे, लवकरच त्यांच्या बरोबर चर्चा करून पुढील पाऊले उचलली जातील. यापुढेही आपला सहभाग आणि प्रतिसाद असाच राहिला तर आपली मराठी खऱ्या अर्थाने ‘विश्वात्मक’ होण्याचा दिवस दूर नाही, हे निश्चित!

आपली नम्र,

- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
Vidya.Joshi@bmmonline.org

## या अंकात...

पान क्र.
- ‘लेखक तुमच्या भेटीला’- उपक्रमाची संकल्पना आणि... २
- बृ. म.मंडळ अधिवेशन २०२२- वार्ता: ३
- लेख:- दोन सुलट दोन उलट ४
- युरोपियन मराठी संमलन २०२२ ५
- लेख:- अमेरिका विरुध्द भारत- रस्त्यावरचं खाद्यजीवन
- लेख:- माझी माती माझे आकाश ६
- लेख: - निसर्ग-वारी- अनोखी सुरवात! ८
- लेख:- उत्तररंग १०
-
पुरवणी ई विभाग: अमेरिकेतल्या गणेश चतुर्थीची धामधूम
उत्तररंग सत्र अहवाल
For Kids: Game -CATCH 3
- BMM YuvaVani - Newsletter
- राशिभविष्य:- सप्टेंबर २०२१
-Matrimonial and Business Advertisements १०-१२

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer - Sona Bhide**
**3574 S. Marion Way, Chandler, AZ 85286**
Ph- (480) 812-9511 (PST) Email- sona.bhide@bmmonline.org
**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription



**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50



वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.



**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्

**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन

**सदस्य** : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

**सदस्य** : सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...



**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:** https://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com or vinatak.bmmvrutta@gmail.com

Address: 3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503


# ‘लेखक तुमच्या भेटीला!’ - उपक्रमाची संकल्पना आणि...

- **विनता कुलकर्णी** (संपादक, बृहन्महाराष्ट्र वृत्त)

बृहन्महाराष्ट्र मंडळाचा ‘लेखक तुमच्या भेटीला!’ हा नवीन उपक्रम सुरू होऊन आता एक वर्ष झाले. या मागची संकल्पना माझी, आणि त्यामागची पार्श्वभूमी अशी:

उत्तर अमेरिकेतील मराठी मंडळांमध्ये संस्कृती संवर्धनाच्या उद्देशाने आपण महाराष्ट्रातील व उत्तर अमेरिकेतील कलाकारांचे नृत्य, नाट्य, चित्रपट, संगीत यांचे अनेक कार्यक्रम नियमित आयोजित करत असतो. मात्र गीत, नाटक, चित्रपट यांच्या संहितेमागे कुणी लेखक असतो, ही बाब कित्येकदा दुर्लक्षित राहते. मराठी मंडळांमध्ये काहीवेळां महाराष्ट्रातील लेखक, कवी यांना आमंत्रित करून त्यांच्याशी गप्पागोष्टींचा कार्यक्रम आयोजित केला जातो, आणि ही चांगली गोष्ट आहे. परंतु महाराष्ट्राबाहेर, परदेशात राहून आपल्यातील काही मंडळी, ज्यांच्या पुस्तकांना, लेखनाला महाराष्ट्रातही दाद मिळते, अशा लेखकांच्या लेखनाविषयी माहितीपर कार्यक्रम त्यांच्या गावातील मराठी वर्तुळांत आणि विविध मराठी मंडळात क्वचितच होतात. त्यांचे लेखनकार्य बरेचदा अंधारातच राहते.

उत्तर अमेरिकेतील लेखकांच्या लेखनकार्याचा अधिक परिचय व्हावा या हेतूने गेली अनेक वर्षे **बृहन्महाराष्ट्र वृत्तात लेखकांच्या** नवीन प्रकाशित **पुस्तकांचा परिचय** करून दिला जातो. अलिकडे काही वर्षे **बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात** अशा लेखकांचा सन्मान व त्यांच्या पुस्तकाबद्दल दोन-चार ओळीत माहिती असा संक्षिप्त कार्यक्रम असतो. त्याचीच पुढची पायरी म्हणजे, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सध्याच्या कोव्हिडजन्य परिस्थितीशी जुळवून घेत असताना **‘फेसबुक व यूट्युब लाइव्ह’** माध्यमांतून आपल्यांतील लेखकांशी त्यांच्या लेखनाबद्दल गप्पागोष्टींचा, **‘लेखक तुमच्या भेटीला!’** हा कार्यक्रम! यानिमित्ताने लेखनकलेस अधिक प्रोत्साहनही मिळू शकेल, असा विचार मी बृहन्महाराष्ट्र मंडळ अध्यक्ष विद्या जोशी आणि कार्यकारिणी (२०१९-२०२२) यांच्यापुढे मांडला आणि कार्यकारिणीने त्यांस पाठिंबा दिला.

सध्या दर महिन्याला बृ. म. मंडळ कार्यकारिणीवरील काही सदस्यांच्या सहभागाने उत्तर अमेरिकेतील आमंत्रित लेखकांशी गप्पागोष्टीतून त्यांच्या प्रकाशित पुस्तकांची ओळख**,** जमल्यास स्वलिखित- कथा, कविता यांचे भाववाचन, असे सादरीकरण चालू आहे. कोव्हिडचे सावट दूर झाल्यावरही ‘लेखक तुमच्या भेटीला!’ हा ऑनलाईन कार्यक्रम चालू राहील, जमेल तेव्हा असे प्रत्यक्ष ऑनसाईट कार्यक्रमही होतील याबद्दल आशावादी आहे.


***

**टीप: ‘लेखक तुमच्या भेटीला’ भाग १२:** शनिवार,ऑगस्ट २८, २०२१- **लेखक:- डॅन मयूर** (टेक्सस), **संवादक:- कोमल चौक्कर** (लॉस अँजलीस)**, कार्यक्रमाची यूट्युब लिंक:-**
**https://www.youtube.com/watch?v=416J2WyFB8U**

# मराठी विश्‍व (न्यूजर्सी) संयोजित बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता

## ऑगस्ट ११ ते १४, २०२२ - अटलांटिक सिटी, न्यू जर्सी

**- प्रशांत कोल्हटकर**
**(बृ. म. मं. अधिवेशन २०२२, न्यूजर्सी- संयोजन-प्रमुख )**



नमस्कार मंडळी,

BMM २०२२च्या अधिवेशनाला आता एक वर्षाहून कमी कालावधी उरला आहे. एक वर्षांपूर्वी याच सुमारास उत्तर अमेरिकेतील मराठी समुदायाला बीएमएम अधिवेशन होईल की नाही, याबद्दल शंका होती आणि काही प्रमाणात ते खरे होते. त्यावेळी संपूर्ण जग बहुतांशी कोविडच्या संकटाच्या दाट सावटाखाली होते. पण कर्ता-करविता परमेश्वराच्या कृपेने आपण सगळेजण त्यातून हळूहळू बाहेर पडतो आहे.

त्याच वेळी, बीएमएम अध्यक्षा सौ विद्या जोशी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली बीएमएम समितीने न्यू जर्सी इथल्या 'मराठी विश्व' मंडळाकडे अधिवेशनाची जबाबदारी सोपवली. मराठी विश्वने ही धुरा समर्थपणे पेलण्याचे शिवधनुष्य उचले आणि बीएमएम २०२२च्या अधिवेशनाची तयारी सुरू केली. वेगवेगळ्या क्षेत्रातल्या निपुण लोकांकडे नेतृत्वाची जबाबदारी सोपवून मग त्यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या समित्यांनी आणि उपसमित्यांनी आकार घेतला. कामकाजाची विषयवार वाटणी होऊन बाकीच्या हालचालींना वेग आला. न्यू जर्सीच्या मराठी समुदायाने नेतृत्व संघावर दृढ विश्वास दाखवला आणि अनेक स्वयंसेवक बीएमएम २०२२च्या दिशेने होणाऱ्या या प्रवासात अत्यंत उत्साहाने सामील होऊ लागले. गेल्या एक वर्षातील अशा अनेक उत्साहवर्धक घडामोडींचा विचार करून आम्हा समस्त मंडळींचा आनंद अजून द्विगुणित झाला आहे.

**Henry Ford once said, "Coming together is a beginning. Keeping together is a progress. Working together is a success."** एकत्र येणे ही सुरुवात आहे, एकत्र राहणे ही प्रगती आहे, पण एकत्र काम करणे हे यश आहे. ह्याच उक्तीला अनुसरून अधिवेशनाच्या दिशेने होणारे आपले मार्गक्रमणही यशाच्या दिशेने चालले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आमची बीएमएम टीम "GO GREEN", Education Summit सारखे काही नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहे. अधिवेशनातील महत्त्वाची व सर्वांच्या आवडीची गोष्ट म्हणजे, सुग्रास आणि वेगवेगळ्या प्रांतातल्या वैविध्यपूर्ण जेवणाचा आप्तेष्ट, परिवार आणि मित्रमंडळींच्या सोबतीने आस्वाद घेणे, कारण उत्तम जेवणाच्या जोडीला मग मनसोक्त, मनमुरादपणे गप्पा आणि तीन दिवस आयते स्वादिष्ट, जेवण म्हणजे तर पर्वणीच. मागील वृत्तामध्ये नमूद केल्याप्रमाणे बीएमएम २०२२ अधिवेशनात **सेलिब्रिटी शेफ श्री विष्णू मनोहर** वैयक्तिकरित्या उपस्थित राहणार आहेत.

उत्तम भोजनाच्या जोडीला करमणुकीचे दर्जेदार कार्यक्रम हादेखील अधिवेशनाचा महत्त्वाचा घटक आहे. नाटक, संगीत, गाण्याचे कार्यक्रम, नृत्य, मुलाखती, विविध स्पर्धा, भारतातून येणारे आणि स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम, लहान मुलांसाठी, तरुणांसाठी कार्यक्रम, ओपनिंग सेरेमोनी, क्लोजिंग सेरेमोनी, प्राइमटाइम प्रोग्राम इत्यादी... म्हणजे जणू काही तीन दिवसांची आनंदयात्रा! अधिवेशनात आनंद आणि उत्साह पेरायला, अधिवेशनाला जत्रेचे रूप प्राप्त करून द्यायला ह्या कार्यक्रमांचा मोलाचा वाटा असतो. या कार्यक्रमांविषयी आपल्या कल्पना आणि प्रस्ताव पाठवण्याची मुदत १५ ऑगस्ट पर्यंत होती. आमच्या प्रोग्रामिंग टीमकडे कार्यक्रमांसाठी **विक्रमी २३५ प्रस्ताव** आले आहेत. संपूर्ण उत्तर अमेरिकेतून आम्हाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. भारतातून केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर गोवा, छत्तीसगड आणि अगदी राजस्थान मधूनही प्रस्ताव आले. यावरून आपल्या मराठी समुदायामध्ये अधिवेशनासाठी अभूतपूर्व उत्साहाचा वारा वाहतो आहे, हेच सूचित होते. या सर्व प्रस्तावांचे मूल्यांकन करून त्यातून दर्जेदार मनोरंजनाचे कार्यक्रम निवडून तुमच्या समोर सादर करण्यासाठी आमची प्रोग्रामिंग टीम वचनबद्ध आहे. एवढ्या मोठ्या संख्येने आलेल्या कार्यक्रमांमधून केवळ २५-३० उत्तम कार्यक्रम निवडणे हे **प्रोग्रामिंग प्रमुख श्री संदीप धरम** आणि निवडसमितीमधले त्यांचे इतर सहकारी यांच्यासमोर मोठे आव्हान आहे. हे आव्हान यशस्वीरीत्या परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वार्थाने प्रयत्नशील राहू अशी खात्री बाळगतो.

कार्यक्रम फक्त मनोरंजनाचे असावेत का? तर नाही, कार्यक्रम असे असावेत की जे आपल्या मनाला आनंद देतील, आपल्या विचारांना चालना देतील, माणसांना एकमेकांशी जोडतील. व्यापार परिषेदला या अधिवेशनात आपण विशेष स्थान देऊ करू. बिजनेस कॉन्फरेन्स सगळ्यांसाठी करायचा आपण प्रयत्न करू. त्यासाठी, "skills building, networking opportunities, career guidance opportunities, leadership coaching अशा गोष्टींचा समावेश करून मराठी माणसांना एकमेकांशी जोडायचा आपला प्रयत्न असेल. याच कारणास्तव आम्ही **हार्वर्ड बिझनेस स्कूलचे श्री. श्रीकांत दातार** यांच्याशी संपर्क साधला आहे आणि त्यांनी आपल्या बिझनेस कॉन्फरन्सचे प्रमुखवक्ता म्हणून येण्याची संमती दर्शविली आहे.

या अधिवेशनात आपल्या सूचनांचा विचार करून कार्यक्रमांच्या स्वरूपात काही बदल करू. बदलत्या काळानुसार जे नवीन, चांगले आणि योग्य असे कार्यक्रम तुमच्यासमोर सादर करू. एका अधिवेशनात नवीन रस्ता तयार होणार नाही, याची आम्हाला जाणीव आहे, पण नवीन पायवाट करण्याचा प्रयत्न तर आपण करू शकतो आणि सर्वपातळीवर प्रयत्नांची पराकाष्टा करून २०२२च्या एका भव्यदिव्य सोहळ्याचे स्वप्न आम्ही तुम्हा सर्वांच्या मदतीने नक्कीच साकार करू.

प्रत्येक उगवता दिवस एक नवीन आशा, एक नवीन स्वप्न घेऊन जन्माला येतो त्याचप्रमाणे प्रत्येक महिना आपल्या BMM २०२२च्या अधिवेशनाकडच्या वाटचालीचा प्रगतीचा पुढचा टप्पा गाठतो आणि त्याचा नवीन आढावा घेऊन मी परत पुढच्या महिन्यात तुमच्यासमोर येईन. चला तर मग आता तुमचा इथेच निरोप घेतो.

***

# दोन सुलट दोन उलट

**- विद्युल्लेखा अकलूजकर** (व्हँकूव्हर, कॅनडा)

**"बंधुत्वाचा फिरवित चरखा  एकत्वाचे सूत्र धरूया!"**



एरवी मी खेळाच्या स्पर्धांच्या रोजच्या बातम्या न वाचणारी. तरीपण जग ज्याला भरपूर महत्त्वाचे मानते, त्या दरवर्षीच्या ऑलिम्पिक सामन्यांबद्दल थोडीफार उत्सुकता माझ्याही मनात झिरपत राहतेच. पण ती तेवढ्यापुरतीच. एकाद्या वर्षी फिगर स्केटिंगचे खेळाडू सुवर्णपदक मिळवताना मला टीव्हीशी खिळवून ठेवायचे, कधीकधी पाण्यात पोहणाऱ्यांची अप्रतिम उलट्यासुलट्या कोलांट्या उड्या मारत केलेली शरीरफेक मला दिपवून जायची. तरी चार दिवसांनंतर मला एकाही खेळाडूचे किंवा सामन्यांमधे सुवर्णपदक जिंकलेल्यांचे नाव आठवत नसे. यावर्षी मात्र हे चित्र संपूर्णच बदलले. यंदाच्या टोकियोमधील ऑलिंपिक सामन्यात सुवर्णपदक विजेत्या निदान दोन व्यक्तींची नावे आणि चेहरे तरी जन्मभर आठवत राहणार आहेत. कतारचा मुताझ एस्सा बार्शिम आणि इटालीचा ज्यांमार्को ताम्बेरी हे ते पुरुषांच्या उंच उडीच्या स्पर्धेत जोडीने सुवर्णपदक जिंकणारे दोघे जण.

त्या दोघांची नावेच नव्हेत तर त्यांनी या सामन्यात धावत येऊन, हळूहळू अधिक उंच होणाऱ्या आडव्या दांडीवरून एकापाठोपाठ एक झोकात मारलेल्या कितीतरी अप्रतिम उंच उड्या आठवणार आहेत. त्यासोबत शेवटी, निर्णयदात्या परीक्षकाशी कतारच्या बार्शिमचा झालेला तो संक्षिप्त संवाद आणि त्याआधी आणि नंतरचा ताम्बेरी आणि बार्शिम यांचा एकमेकांशी घडलेला मूक संवादही माझ्या कानात गुंजत, मनात साजरा होत राहणार आहे. कारण त्या स्पर्धेत त्या दिवशी त्या पटांगणावर जे काही विलक्षण नाट्य घडले, ते पाहण्याचे भाग्य लाभलेल्या सर्वांची माझ्याचसारखी प्रतिक्रिया झाली असणार यात मला शंका नाही! किंबहुना त्या प्रसंगाचे यु ट्युबवर असलेले कितीही विडियो कितीदा पाहिले, तरी मला आयुष्यातली एक अप्रतिम आनंददायक गोष्ट पाहिली आपण, असा पुन्हापुन्हा साक्षात्कार होत राहतो. https://www.youtube.com/watch?v=2I24B5AV7tA

हा त्या दिवशी घडलेला प्रसंग म्हणजे पुढच्या पिढ्यांच्यासाठी एक संस्मरणीय इतिहास होता. पाहणाऱ्या प्रत्येकाच्या हृदयाला भिडणारा, अंतर्बाह्य हालवून गेलेला, माणसाच्या खिलाडू वृत्तीबद्दल अभिमान वाटायला लावणारा हा प्रसंग होता. कतार या देशाला मिळालेले ते ऑलिम्पिकमधले दुसरे सुवर्णपदक होते. आणि ज्याने ते मिळवले, तो तीस वर्षांचा खेळाडू बार्शिम याने २०१८ मध्ये खेळात जखमी झाल्यावरच्या यातना आणि पुढच्या स्पर्धेत उतरतां न येण्याचे दु:ख, हे सगळे एकदा अनुभवलेले होते. तसेच २०१६ मध्ये इटालीच्या ज्यांमार्को ताम्बेरीच्या पायाच्या घोट्याला जबर जखम झाल्यामुळे त्यालादेखील त्या स्पर्धेतून बाद होऊन, पाच लोकांनी आणलेल्या स्ट्रेचरवरून रडत-ओरडत बाहेर जावे लागले होते, आणि तशाच यातना सोसाव्या लागल्या होत्या. त्यावेळचा आपल्या पायाला घातलेला, नंतर काढलेला प्लास्टिकचा कास्ट ताम्बेरी आता टोकियोच्या ऑलिम्पिक क्रीडांगणावर घेऊन आला होता, आणि तो त्याने त्याच्या बसायच्या जागेशेजारीच ठेवला होता, त्या दु:खद दिवसांच्या आठवणीसाठी. त्या कास्टवर "Road to Tokyo Olympics ~~2020~~ 2021" असे शब्दही लिहिलेले होते. आपण पुन्हा खेळणार की नाही कधी स्पर्धांमध्ये, याचीदेखील शाश्वती नव्हती बिचाऱ्याला काही दिवस, पण या स्पर्धेचा काळ लांबला, हे पथ्यावर पडले त्याच्या! #HMSport #GianmarcoTamberi #MutazEssaBarshim

हे दोघेही खेळाडू परस्परांचे स्पर्धकही आणि खूप जवळचे मित्रही आहेत. २०१६ साली झालेल्या ताम्बेरीच्या पायाच्या जखमेनंतर बार्शिमने त्याला भरपूर मानसिक आधार देऊन पुन्हा खेळात, स्पर्धेत उतरायला मदतही केली होती. ताम्बेरीनेच एका मुलाखतीत बार्शिमने आपल्याला, आपल्या निराशेच्या कठीण काळात, शांतपणे खेळून पुन्हा आत्मविश्वास कमवायला कशी अमोल मदत केली ते सांगितलेले आहे. गेली दहाअकरा वर्षे ते दोघेही जागतिक स्पर्धांमध्ये आपापल्या देशासाठी पदक मिळवण्याचे प्रयत्न करीत होते. ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवण्यासाठी करायच्या रोजच्या अपार कष्टांशी दोघांचीही ओळख होती. पण १ ऑगस्ट २०२१ या दिवशीच्या स्पर्धेत शेवटपर्यंत एकही चूक न करता लखलखीत गुणवत्ता घेऊन टिकलेले हेच दोघेजण होते.

जवळजवळ तीन तास चाललेली पुरुषांच्या उंच उडीची ही चुरशीची स्पर्धा होती. सुरुवातीला यात तेरा राष्ट्रातले एकूण पंधरा खेळाडू होते. ज्या दांडीवरून उडी मारायची तिची उंची २.१९ मीटर्सपासून वाढवत वाढवत ती २:३३, २.३५, २.३७ करीत आणली होती. तिथपर्यंत हे दोघेहीजण सर्वात अप्रतिम खेळत होते. दांडीला त्यांचा एकदाही स्पर्श झाला नव्हता. तिन्ही बाजूंनी पाहताना त्यांच्या उड्या म्हणजे पक्ष्यांच्या झेपेसारख्या अलगद आणि सहज मारलेल्या वाटत होत्या. दोघेही तोडीस तोड! बाकीचे सारे चांगले खेळाडू असूनही हळूहळू गळले होते. त्यांच्यासोबत उरलेल्या तिसऱ्या खेळाडूला, बेलारूसच्या नेदेसेकॉव्हला ब्राँझपदक मिळणार, हे निश्चित झाले.

आता केवळ या दोघांतच सुवर्णपदक कोणाला एवढाच प्रश्न उरला. पण त्यानंतरच्या वाढवलेल्या उंचीच्या दांडीवरून, म्हणजे २.३९ मीटर्सवर मात्र या दोघांपैकी कोणालाच तीनतीन वेळा प्रयत्न करूनही उंच उडी मारता आली नाही. म्हणजेच दोघेही पुन्हा अगदी एकसारखेच ठरले. त्यानंतर दांडी आणखी उंच करून स्पर्धेचा शेवटचा टप्पा (जंप ऑफ) पार करायचा की नाही? परीक्षक हे विचारत येत होते. या वेळी थकलेल्या ज्यांमार्को ताम्बेरीने न बोलतां आपल्या प्रतिस्पर्ध्याशी मूकपणे हस्तांदोलन केले, त्याला घट्ट मिठी मारली. जणू त्याने बार्शिमचे सुवर्णपदक अबोलपणे मान्य केले. पण त्याच्या मिठीत असतानाच त्याला बाजूला करून बार्शिमने जवळ आलेल्या परीक्षकाला एक छोटा प्रश्न केला,"कॅन वी हॅव टू गोल्ड्स?"

परीक्षकांनी म्हटले, "शक्य आहे, जर तू ठरवलंस, की..." त्याचे हे वाक्य अर्धेच राहिले, कारण या दोन्ही खेळाडूंनी एकमेकांकडे नुसतं पाहिलं, आणि बार्शिमचे हृद्य मनोगत, बाजूला उभा राहून त्याला निरखणाऱ्या ज्यांमार्कोच्या मनाला लगोलग उमजलं.

बार्शिमने "हिस्टरी, मॅन!" एवढंच म्हटलं, आणि परीक्षकाला बाजूला ठेवून ताम्बेरीने चक्क बार्शिमच्या कंबरेवर उडी मारून त्याला आनंदाने कवटाळलं, आणि नंतर भूमातेवर गडबडा लोळून रडत-ओरडत क्रीडांगणावर  नाचत, फिरत

आपल्या अनावर भावना जगजाहीर केल्या! आपल्या पायाचा जुना कास्ट हातात घेऊन तो सर्व लोकांना दाखवीत फिरला. छातीवर हात मारून जयनाद करणे, डोळ्यातून आसवे पाझरणे, हे चालूच! पलिकडे बार्शिम आपल्या टीमच्या जवळ जाऊन डोळे पुसत सगळ्यांकडून घट्ट मिठ्या आणि शाबासकी घेत होता. हा जयघोष पाहताना खरोखर आपल्या अंगावर रोमांच उभे राहात होते! सबंध स्टेडियममधे प्रेक्षकांकडून एक सुंदर आनंद-नाद चालू झाला होता. लोक खेळाडूंना कवटाळत होते, शाबासकी देत होते, आणि जवळजवळ सगळ्यांचेच डोळे पाझरत होते. त्या सुवर्णपदकावर आपल्या या प्रतिस्पर्ध्याचाही तितकाच हक्क होता, हे दोघांनाहि माहीत होतेच. पण बार्शिमने तिथल्या तिथे तो प्रश्न तत्काळ विचारून ताम्बेरीला त्याचे श्रेय मिळवून दिले, आणि हे त्याचे न्याय्य सत्कृत्य त्या दिवशी पाहणारे सगळे धन्य झाले!

त्यानंतर दोन सुवर्णपदके घेऊन आलेल्यांकडून प्रथम एकाची माळ हातात घेऊन ताम्बेरीने ते आपल्या मित्राच्या, बार्शिमच्या गळ्यात स्वहस्तें घातले, आणि नंतर बार्शिमनेही तसेच करून ताम्बेरीच्या गळ्यात स्वहस्तें पदकाची माळ घातली. दोन्ही देशांची राष्ट्रगीते वाजवली गेली, तेव्हा प्रथम कतारच्या गीताच्या वेळी बार्शिम त्याचे शब्द म्हणत होता, आणि ताम्बेरी त्याच्या मागे उभा राहून ऐकत होता. नंतरच्या इटालीच्या राष्ट्रगीताच्या वेळी त्यांनी आपापल्या जागा बदलल्या आणि ताम्बेरीने हृदयावर हात ठेवून आपले राष्ट्रगीत म्हटले.

"विविधरंगी वसुंधरेचे, वस्त्र विणिले पांडुरंगें" हे तर तो चुरशीचा सामना पाहताना दिसतच होते! सामना खेळताना ते सगळे स्पर्धक चुरशीनेच खेळत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एकाग्रता आणि ताण दिसत असे. पण जगभरातले सगळीकडचे काळे, गोरे, पिवळे, भुरे, असे विविधरंगी खेळाडू तिथे एकत्र येऊन, एकमेकांशी स्पर्धा करतानादेखील एकमेकांसाठी टाळ्या वाजवीत होते. "करचरणांच्या मागावरती, मनामनांचे तंतू टाका" हेदेखील प्रत्येक टीममधल्या सगळ्यांच्याच अंगवळणी पडलेले होते. चपळ पायांनी पळत येऊन उडी मारणाऱ्या प्रत्येक खेळाडूला उत्साही हातांनी टाळ्या वाजवून उत्तेजन देणारे सगळे प्रेक्षकही तसेच आपुलकीचे वस्त्र करचरणांच्या मागावर विणत होते. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे "बंधुत्वाचा फिरवित चरखा, एकत्वाचे सूत्र धरूया" याचा एक अप्रतिम वस्तुपाठ त्या क्रीडांगणावर बार्शिमच्या त्या कौतुकास्पद कृत्यामुळे सर्वांना पाहायला लाभला. धर्म, जात, वंश, देश, भाषा यातील कसल्याही भेदांना न जुमानतां तिथे केवळ एका खेळातील पराक्रम करायला जमलेल्या त्या समानशील खेळाडूंनी बंधुत्व आणि खिलाडू वृत्ती म्हणजे काय असते, त्याचीही संथा पुढील पिढ्यांना दिली. खेळाच्या सामन्यांच्याच नव्हे, तर माणुसकीच्या इतिहासातलेही ते सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगते पान होते!

***

## युरोपियन मराठी संमेलन २०२२

२०२० साली कोविडमुळे रद्द झालेले युरोपियन मराठी संमेलन आता ६ ते ८ मे, २०२२ या दिवसांत म्युनिक, जर्मनी येथे भरेल असे संमेलनाच्या समितीने त्याबाबत घोषणा करून जाहीर केले. संमेलनाला उपस्थित राहण्याची इच्छा असल्यास, नावनोंदणी व अधिक माहिती खालील संकेतस्थळावर पहावी.
https://www.ems2020.de/content/home

## अमेरिका विरुध्द भारत - रस्त्यावरचं खाद्य जीवन

**- सुधीर धर्माधिकारी** (सॅन होसे, कॅलिफोर्निया)



रस्त्यावर उभं राहून खाण्याची सोय शक्यतो अमेरिकेत मिळत नाही. त्याच्याकरता भारताची वेगळी ट्रिप करावी लागते. कुठेही थांबून एखादा वडा-पाव गिळंकृत करणे, यातली मजा अमेरिकेत कुठेच नाही. तसंच "ड्राईव्ह थ्रू"ची सोय भारतात नाही. मी तरी अजून ऐकली नाही. म्हणजे एका खिडकीत गाडीतूनच ऑर्डर द्यायची, आणि दुसऱ्या खिडकीत लगेच पदार्थ हातात; आपण आपल्या कार मध्येच! ऑर्डर देताना आपले इंडियन उच्चार आणि ऑर्डर घेणाऱ्याचे उच्चार यांच्यातला फरक एवढाच काय तो 'struggle'. हेच काय ते अमेरिकेतले स्ट्रीट किंवा फास्ट फूड.

अर्थातच, भारतातला रस्त्यावरचा तो खमंगपणा, तो भरभरून सुटलेला वास, यांच्यामुळे आमच्या वाहनांची पावलं आपोआप गाडीवाल्याकडे वळतात. वडापाव हा भारतातल्या, मुख्यतः महाराष्ट्राच्या 'स्ट्रीट फूड'चा जनक. हा सगळ्या बाबतीत दानशूर. मग चव घ्या किंवा कॅलरीज. अमेरिकेत याचा एक लांबचा भाऊ आहे. बर्गर नावाचा. पण बर्गर एकदम स्वभावाने साधा, वडापावचा झटका त्यात नाही. या बर्गरचं एक खरंच आश्चर्य वाटतं, थोडेसे कपडे बदलून हा बर्गर वेगवेगळ्या नावाने येतो आणि आख्ख्यां फास्ट फूड फॅशन मार्केटवर राज्य करतो. बरं झालं, या अमेरिकेमध्ये बाहेरच्या देशातून लोक आले आणि त्यांनी नूडल्स वगैरे पदार्थ आणले. नाहीतर, या बर्गरने आमचं खाद्यजीवन दोन पावामध्ये बंदिस्त करून टाकलं असतं. आपल्या चटकदार बटाटावड्यासमोर याची स्पाइसी पॅटी पण शरमिंदी होते. या बर्गरमध्ये दोन 'प्याट्या' घालून त्याला जबरदस्त लठ्ठ करतात आणि त्याला "व्हॉपर" वगैरे जोरदार नाव देतात. म्हणजे एकाच पावामध्ये दोन वडे घालून जर त्याला असंच काहीतरी नाव द्यायचं, "महाकायवडा" किंवा राक्षसवडा! वडापावची गर्लफ्रेंड म्हणजे भजी. वडापाव पुरुष-प्रकृती प्रमाणे मोनोटोनस असतो, त्याच्या तनामनात फक्तं बटाटा. पण भजीचा मूड कधी, बटाटा, कांदा, पालक, मिरची असा बदलत असतो. भिजलेल्या अवस्थेत भजी अगदी रोमँटिक वाटते, म्हणजे आपण भिजलेले असताना! पावसात भिजत वडापाव आणि भजी ही जोडी नृत्य करते, तेंव्हा लक्ष फक्त भजीकडे जातं.

वडापावची गुजरात मधली चुलत बहीण म्हणजे कच्छदाबेली. तिच्यात डाळिंबाच्या लालीमुळे गुजरातचा गोडसरपणा असतो. समोसा हा पण वड्याच्याच घराण्यातला, पण जरा जास्त शहाणा, शहरी आणि स्टाईलमध्ये भांग पाडणारा. ही त्याची स्टाईल अमेरिकन लोकांनादेखील आवडते. सगळ्या बॉलीवूडच्या हिरोंमध्ये अमेरिकेत काही कारण नसताना जसा अक्षय कुमार जास्तं फेमस आहे, तसा समोसा पण काही कारण नसताना इथे सगळ्यात जास्तं फेमस आहे. अख्ख्या वडापाव घराण्याचा फोटो अल्बम मी येथे आठवणीत काढला आहे, तर जाता जाता बटाटा पॅटिस पण आठवले. ओव्हनमध्ये बनवलेले हे पॅटिस म्हणजे थोडक्यात काय तर, खारी (खाण्यातली) मध्ये बटाट्याची भाजी!

बटाट्याचा जन्मं झाला पेरू देशात. नंतर बरीच शतके हा बटाटा युरोपमध्ये वाढीस लागला. परंतु तो मसाला डोस्याच्या भुयारातून भारतात घुसला असा माझा समज आहे. मसाला डोसा, उत्तप्पा हे एक स्ट्रीट फूड मधलं पूर्ण वेगळं (पण करणाऱ्या अण्णाच्या पोटा येव्हढं) वजनदार घराणं. या घराण्याला तोडीचं उत्तर अमेरिकन 'स्ट्रीट फूड'मध्ये कुणी नाही. डोस्यात भाजी हे थोडे मेक्सिकन 'बरिटो'च्या अंगाने जाईल. पण हा बरिटो म्हणजे एक लुव्या मेक्सिकन पोळीच्या आत ठासून भरलेली मेक्सिकन भाजी, असा साधा हिशोब. आपल्या थालीपिठात कसं काहीही कुस्करून जाऊ शकतं, तसं ह्या बरिटोच्या पोटात बरंच काही असतं. पण त्या फ्रँकी सारखी, पोळी-मध्ये-भाजी हे मेक्सिकन प्रकरण भारतीयांचा कायम चॉईस असतो.

भारतात वळवळ करत येणारं पहिलं नूडल म्हणजे "मॅग्गी". दोन मिनिट्स, असं म्हणत या मॅग्गीने घराघरातल्या आळशीपणात भर घातली. तिला बेचव म्हणून सुरुवातीला खूप हिणवलं गेलं. त्यातलं मसाला पाकीट आमटीमध्ये टाकून, मॅग्गी नूडलची गोड खीर करून, परत आयुष्यात कधी मॅग्गी न खाण्याचा संकल्प केलेली मंडळी मी बघितली आहेत. परंतु मॅग्गीला गृहप्रवेश मिळाला आणि नंतर "चायनीज फूड"च्या नावाने भारताच्या रस्त्यारस्त्यांवरून ह्या नुडलची चळवळ सुरू झाली. या चायनीज पदार्थाला भारताने इतकं मसालेदार झणझणीत केलं, की खऱ्या चायनीज माणसाला ते खायला दिलं तर, तो म्हणेल मी ऑक्टोपसच्या विळख्यात जीव देईन, पण हे इंडो-चायनीज नको. अमेरिकेत चायनीज स्ट्रीट फूड रस्त्यावर नाही मिळालं तरी, "पांडा एक्सप्रेस"मध्ये मिळतं. बर्गर प्रमाणेच इथल्या नूडलने साधं स्वरूप धारण केलेलं असतं. तिखटपणा चिली सॉस वरून घालून उसना घ्यावा लागतो. इतकेच नव्हे, ऑरेंज चिकन, टेरियाकी चिकन यांना चक्क गोड करून त्या चिकनच्या आत्म्याचा छळ करतात. सुरुवातीला ते खाताना जुन्या गर्लफ्रेंड सारखं त्या कोल्हापूर चिकनची आठवण येते. ऑफिसमध्ये एका अस्सल चायनीज माणसाने पांडा एक्सप्रेसचं नाव ऐकून, नसलेलं नाक मुरडलं होतं. तेंव्हा कळलं, की अमेरिकेतही चायनीज फूड अमेरिकन केलेलं आहे, किंवा या मेनूमध्ये एकही वटवाघूळाची किंवा साधं कुत्र्याची डिश नाही, हेच या चिनीला "नॉट ऑथेंटिक" वाटतं, तर भारतातली चायनीज भेळ दिल्यावर काय परिस्थिती होईल! या अशा चायनीज खाद्यसंस्कृतीमुळे भारतातल्या रस्त्यावरच्या खाण्यातही नॉनव्हेज आलं.

भारतात रस्त्यावर खाण्याच्या पदार्थांचे पूर्वज म्हणजे भेळ-पुरी, पापडी-चाट वगैरे. परंतु हे इतकं इंडियन आहे, की, याला अमेरिकेतच काय, जगात तुलना करण्यासारखं बहुधा काही नसेल. मुळातच आपल्या नेहमीच्या मुरमुऱ्याला "पफ राईस" असं नाव देऊन हे लोकं त्यातला कुरमुरीतपणा घालवतील. शिवाय यांना चिंच हा प्रकार माहिती नाही. त्यांना चिंचेचं पाणीच करता येत नाही, तर हे पाणी एका फुगलेल्या पुरीत कसं काय जाईल, हा मुळात प्रश्नं! परंतु पाणीपुरी सारखे प्रकार हे अमेरिकन लोक ऑफिसच्या पार्टीमध्ये "Oh, that's interesting" म्हणून खातात. शिवाय "Its hot" असं म्हणून डोळ्यांतून पाणी काढतात. भारतात असताना ऐकलेले, 'गाडीवाल्याचे जितके हात कळकट, तितकी अधिक, त्याच्या हाताला चव', हे वाक्य आठवलं, आणि इकडे अमेरिकेत "Employees must wash their hands", अशी पाटी लावलेली संस्कृती! एव्हढी स्वच्छता पाळूनही अमेरिका कोरोनाच्या लागणीमध्ये पहिल्या क्रमांकावर !

यंदा "२०२१ मध्ये अगदी हेल्दी खायचं", अशा केलेल्या प्रतिज्ञेच्या अगोदर, 'अनहेल्दी' खाद्यपदार्थांची लेख-रूपात नोंदवलेली ही आठवण !

***

## निवेदन

बृ. वृत्त ऑगस्ट २०२१ मध्ये प्रकाशित रोहित काळे (साऊथ कॅरोलायना) लिखित "चक्रव्हयूह" कविता जगप्रसिध्द लेखक लिओ टॉलस्टॉय यांच्या "How Much Land Does a Man Need?' या सुपरिचित लघुकथेवर आधारित आहे. डॉ. विजय ढवळे (कॅनडा) यांनी या संदर्भाची आठवण करून दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद! - संपादक, बृहन्महाराष्ट्र वृत्त

# माझी माती माझे आकाश

**- सुधा गोरे** (कम्मिंग, जॉर्जिया)



रस्ता संपला तिथे ड्रायव्हरने गाडी थांबवली. रस्ता कसला, खडबडीत दगड गोट्यांची वाटच होती.

"ताई, आता थोडंसं चालावं लागणार आहे."

"ठीक आहे रे. तू आधीच सांगितलं होतंस" असं म्हणून मी पाहिलं, उजवीकडे थोडीफार झाडांनी सावली धरलेली पायवाट होती. रस्ता चालता चालता जगन्नाथ सांगत होता,

"आता इथे काही ब्राह्मणांची वस्ती राहिली नाहीय. जी कांही तीनचार घरं होती, ती सर्व मंडळी कामानिमित्ताने पुण्यामुंबईकडे निघून गेली."

"मग तू कसं काय इथे घर बांधायचं ठरवलंस?" जगन्नाथ माझ्या वडिलांचा दूरचा नातेवाईक.

"घर कसलं ताई, आता बघालंच तुम्ही, साधी छोटीशी झोपडी आहे. पांच- सहा वर्षांपूर्वी मी एकदा गांवी आलो आणि का कोणजाणे असं वाटलं, इथे आपलं घर असावं. जमिनी तर कुळकायद्यानं गेल्या, पण मोडके घर आणि तीन चार एकरांची जमीन तेवढी राहिली होती. आजूबाजूची सागाची झाडं तोडून जे कांही पैसे आले, त्यांत तुम्ही दिलेले पैसे घालून ही छोटी झोपडी त्यापूर्वीच्या मोठ्या वाड्याच्या जागेवर बांधली. आता दरवर्षी होळीला इथे येतो. खूप मोठ्ठा उत्सव असतो तेव्हा".

"ते बघ, समोर आपलं घर", रस्त्यावर थांबून त्याने उजवीकडे बोट केलं.

"आता त्या बांधावरून तेथवर चालत जायचं."

मी पहात राहिले. लांबवर झाडांच्यामध्ये लपलेली ती झोपडी दिसत होती. पाठिमागे डोंगर आणि आजूबाजूला झाडं. पिकं कापलेली म्हणून सर्व सुकलेलं रान आणि सर्वच भाग रखरखीत होता.

"काही आठवतंय का तुला?"

हे काहीच मला दिसत नव्हतं. मी हरवून बसले होते. माझ्या डोळ्यांसमोर होता, तो जुना वाडा. त्याच्या भोवती जांभ्याच्या दगडांचं कुंपण होतं. दांडीचा अडसर काढून आंत जायला लागायचं.

"दांडी कशाला?" मी विचारलं होतं. तेव्हा मी सात/आठ वर्षांची असेन.

"अगो बायो, गुरं आंत येतात, त्यांना बाहेर कोण काढणार?"...आम्हाला घ्यायला आलेल्या कुळवाड्याने सांगितलेलं आठवत होतं.

हे माझ्या वडिलांचे गांव. म्हणजे वाडीच म्हणायची. पूर्वीच्या ह्या छोट्या वस्त्या. तीनचार ब्राह्मणांची घरं, एकादं मारवाड्याचं घर आणि बाकी सारी वहिवाटीने शेती करणाऱ्या कुळवाड्यांची. जवळचे गांव संगमेश्वर.

माझे वडील आणि त्यांची भावंडं शिकायला रत्नागिरीला कशी जात असतील?

रत्नागिरीवरून जगन्नाथाने सांगितल्याप्रमाणे आम्ही संगमेश्वरला आलो. तिथल्या बसडेपोवर तो आम्हाला भेटणार होता, पण आमची चुकामूक झाली. मोबाईल फोन लागत नव्हता, मग विचारत त्याने सांगितलेल्या खाणाखुणा पहात जाताना तो आम्हाला समोरून स्कूटरवरून येताना दिसला.

मला आठवत होतं, तें जुनं मोठ्ठ घर. समोरचं छान सारवलेलं अंगण. बांधाच्या दोन बाजूला आंब्यांची झाडं. एकाला मोगराम्बा आणि एकाला साखरांबा म्हणायचे. दोन्ही रायवळ आंब्यांचीं, पण आंबे इतके गोड आणि रसाळ होते. घरामागे आणि दोन्ही बाजूंना चिकू, पपनस, रामफळ, तीनचार कलमी आंब्यांची आणि फणसांची झाडे होती. एक बरका आणि एक कापा. बरक्या फणसाचे माझी काकू इतकं सुरेख सांदण करायची. ती कोकणांतलीच होती. तांदुळाच्या रव्यात बरका फणसाचा चाळणी मधून काढलेला रस आणि गूळ घालायचा आणि मग ढोकळ्या सारखं उकडवायचं आणि तूप आणि नारळाच्या दुधाबरोबर खायचं. ते मुंबईला मी कधीच खाल्लं नव्हतं. मोगरा सोनचाफा आणि जास्वदीं होती पण मला अजून आठवत होतं ते बकुळीचे मोठ्ठ, उंच झाड. खाली पडलेली फुलं गोळा करून त्यांचे सर करायला खूप मजा यायची. नुसत्या आठवणीनेच मी त्या काळात पोहोचले होते.

"का रे, ती बांध्यांच्या बाजूची झाडं होती का अजून?"

"कुठली झाडं? मी आलो तेव्हां काहीच नव्हतं इथे. बंधारा पण पडलेलाच होता. घराच्या मागची कांही आणि सागाची झाडं तेव्हढी होती. पुढच्या वर्षी थोडे जास्त दिवस राहून कलमी आंब्यांची आणि काही फुलझाडे आणि चिकू पपनस लावायचा विचार आहे माझा, पण मग वाटतं संबंध वर्षभर देखभाल कोण करणार त्यांची?"

मी त्याचं बोलणं ऐकता ऐकता परत माझ्या जगात गेले होते. या गांवात मी पूर्वी अगदी तीनचार वर्षे वयाची असताना आले आणि नंतर आठनऊ वर्षांची असताना. माझ्या आईला माझा भाऊ झाल्यावर आपलं मूळ गाव मुलांना दाखवावं, कुलदेवतेची ओटी भरावी, मुलांना तिच्या पायावर घालावं अशी इच्छा झाली. तोपर्यंत कुणी का होईना घराची देखभाल करत होतं. माझी आई म्हणाली म्हणून माझ्या काकूला, चुलत काकूला वाटलं, ह्यापुढे कुठे जाणं होणार इतक्या लांबवर आणि तोपर्यंत घरांची देखभाल तरी कोण करत असणार?

मग आम्ही सगळी आठदहा चुलत भावंडं आधी बोट मग पडाव करत संगमेश्वरला आलो. त्यावेळी आत्तांसारखे नीट रस्ते पण नव्हते. आमचं घर खालच्या अंगाला आणि रस्त्याच्या वरच्या अंगाला काकूचे घर. मी मुलीला म्हटलं, अगं, तेव्हा आमच्याकडे आत्तांसारखे सेल फोन्स नव्हते. हल्ली मुळी कोणी कुणाशी बोलत नाहीत. पहावं तर सगळीजणं बसलेली असतात समोरासमोर, पण हात मात्र टाईप करत असतात, फोनवर. तेव्हां आम्ही खूप खूप उनाडलो. सक्काळी उठल्यावर वरच्या घरी नाहीं तर खालच्या घरीं तूप आणि मेतकूट घातलेला गरम गरम मऊसर भात खायचा आणि विठ्ठल मंदिरात खेळायला पळायचो. तिथे थंडगार जमिनीवर सागरगोटे, सोंगट्यांचा डाव रंगायचा. भूक लागल्यावर घरीं परतायचो. मग उन्हं ओसरल्यावर मागच्या टेकडीवर करवंदांच्या जाळ्या हुडकायच्या आणि रात्री कंदिलाच्या दिव्याच्या प्रकाशांत पत्ते! - काकू, आई सगळ्याच खेळायला बसायच्या, गड्डा झब्बू नाहीतर बदाम सत्ती!

"आहे का रे, ते विठ्ठल मंदिर अजून?" मी जगन्नाथाला विचारलं.

"ते काय समोर. त्या दीपमाळा दिसताहेत ना? आणि त्याच्या बाजूला शंकराचे मंदिर." दूरवर झाडीमध्ये लपलेलं मंदिर दिसलं. इथेच माझ्या आईनं गुरवाला गाऱ्हाणं घालायला सांगितलं होतं. माझा भाऊ खूप रडत असे, काहीही कारण नसताना. मला तेव्हां मजा वाटली होती त्या आठवणीने हसू आलं. आता कुणाला गाऱ्हाणं म्हणजे काय, सांगायचं म्हटलं, तर कळणारही नाही. डॉक्टरकडे का नाही नेलं विचारतील.

खोती गेली, जमिनी कुळकायद्याने गेल्या. हातांत पैसे नाहीत, पण शिकण्याची इच्छा दांडगी. माझे वडील, त्यांचे भाऊ पुढील शालेय शिक्षणासाठी रत्नागिरीला गेले. तेंव्हा आत्तांसारखी रत्नागिरीला कॉलेजेस नव्हती. मग तेथून पुढे नोकरी करत शिक्षण पूर्ण करायला मुंबई, पुणे, इंदोरकडे सर्वजणं विखुरली गेली. माझ्या मनात आलं, त्यांना हे घर, हे गांव ह्या सर्वांची कितीदा आठवण झाली असेल? संसार, मुलंबाळं, नोकरी, नव्या ठिकाणी स्थिरस्थावर होण्याच्या धकाधकीत इच्छा होऊनही त्यांना येथे यायला जमलं नसेल आणि त्याची कितीदातरी खंत वाटली असेल. पण कुठेतरी मनाच्या कोपऱ्यात त्यांच्या लहानपणीच्या गोष्टी त्यांनी जपून ठेवल्या असतील. ह्या घराचा संबंध तुटला. ज्या कुणी काही वर्षे या घराची देखभाल केली, तोदेखील गेला आणि उरले हे जुने पडझडीला आलेले घर! आणि हा लांबचा नातेवाईक जगन्नाथ, ह्याला इथे यायची इच्छा झाली. काय हा योगायोग!

माझं लग्न झालं आणि आम्ही अमेरिकेस स्थिरस्थावर झालो. दर वर्ष/दोन वर्षांनी मुंबईला जाणं व्हायचं. माझे आईवडील नातवंडांच्या ओढीने माझ्या घरीं बरेच वेळा राहून गेले, म्हणून मुलांना आजीआजोबांची आठवण, ओढ होती. मुलं मोठी झाली, त्यांची लग्न होऊन मार्गी लागली. नातवंडं मोठी होऊन लांब झाली. हल्लीहल्ली मात्र मला काहीतरी मागे राहिलंय असं जाणवू लागलं. माझ्या मुलांनी आपले आजोबा, पणजोबा जेथून आले ते गांव, आपलं घर, तो सर्व आजूबाजूंचा परिसर एकदा तरी पहावा, असं वाटत राहिलं आणि माझ्या वयाच्या ऐंशीव्या वर्षी हा योग जुळून आला होता. सर्वांच्या सुट्या, विमानाची बुकिंग एका वेळेस जुळवून चार ठिकाणांहून आम्ही सर्व एकत्र जमलो होतो.

माझ्या वडिलांचे जुन्या मुंबईच्या जागेचे विकून आलेले पैसे त्यांच्या आणि आईच्या नावाने रत्नागिरीमधील शिक्षण संस्थांना, गरजू मुलामुलींना द्यावे असं आम्ही ठरवलं होतं. हे सर्व काम पार पडल्यानंतर आमच्या नियोजित प्रवासाचा हा शेवटचा टप्पा राहिला होता.

विठ्ठल-मंदिराशी आम्ही टेकलो. मुलांच्या हातून हळद, कुंकू व अक्षता वाहिल्या आणि मनोभावाने नमस्कार केला. मुलांना घेऊन दर्शन घेऊन आम्ही जगन्नाथाच्या घराशी गेलो. इथे आमचा वाडा होता. मुलांचे आजोबा, पणजोबा ह्यांची ही वास्तू! मुलांच्या हातून घराच्या पायरीवर नारळ फोडला, हळद, कुंकू वाहिलं आणि आंत गेलो. हातपाय धुवून देवघरात नमस्कार करून दिवा लावला. मग बाहेरच्या ओटीवर आम्ही सर्व टेकलो.

ताई तुला आठवतं का? होळीला पालखीला ओवाळायचा पहिला मान खोतांचा असतो. घर राहिलं नव्हतं, -

तरीदेखील पालखी दरवर्षी इथे थांबते. एकदा मी सहज आलो असताना तें पाहिलं आणि का कोण जाणे, मला इथे छोटंसं का होईना आपलं घर उभारावंस वाटलं म्हणून मी तुला माझी थोडीशी पैशांची गरज आहे म्हटलं. तू मदत केलीस आणि मी हे घर बांधू शकलो. आता दरवर्षी पालखीला ओवाळायला मुंबईहून मी येतो. त्याचं बोलणं ऐकून मलाच काय मुलांनादेखील भरून आल्यासारखं वाटलं. कुणालाच काही बोलावसं वाटत नव्हतं. थोड्यावेळाने मुलं त्याच्याबरोबर घरामागे गेली. मी तिथेच बसून राहिले.

जेव्हां आम्ही अमेरिकेची सिटीझनशिप घेतली तेव्हाची आठवण झाली. इथेच राहायचे ठरल्यावर नागरिकत्व घेण्याचा आम्ही निर्णय घेतला. त्या दिवशी आता आपला देश भारत नाही म्हणून मन दुखावलं गेलं. ह्या देशाबद्दल आपलेपणा वाटत नव्हता, जनगणमन म्हणताना जसं मन थरारून उठत होतं तसं अमेरिकेचे नॅशनल अँथेम म्हणताना होत नव्हतं. ... आणि मग कधीतरी ही नाळ तुटली. अमेरिका माझा देश आहे, हा अभिमान, गौरव वाटायला लागला. जिवाभावाच्या अमेरिकन मैत्रिणी जोडल्या, आणि ह्या मातीशी नातं गुंफलं गेलं.

समोरून मुलं येताना पाहून मी उठले. मन तृप्त झालं होतं. परतीच्या वाटेचे वेध लागले होते. तिघा मुलांच्या हातांत इथल्या जांभाचे दगड होते.

"हे काय?" मी विचारलं.

"हे मी माझ्या घराच्या जमिनींत ठेवेन. अण्णांच्या घराचे, आपले म्हणून." मुलगी म्हणाली. मी तिच्याकडे पाहतच राहिले. माझ्या एका मुलीने अमेरिकन मुलाशी लग्न केलं, एका मुलीचा नवरा भारतातील मध्यप्रदेशाचा होता. एका नातीने स्वीडिश अमेरिकन मुलाबरोबर लग्न ठरवलं होतं, दुसरीने कोरियन अमेरिकन मुलाशी. माझं आकाश रंगीबेरंगी गोधडीसारखं सगळ्या देशांच्या रंगांनी एकत्र झालं होतं, समृद्ध झालं होतं.


आणि मला जाणवलं, माझी माती, माझं आकाश मी कुठे सोडलं होतं? हज्जारो मैलांचा प्रवास करून आणखी नातीगोती जोडत माझ्याबरोबर ते येत होतं. कुणी सांगावं, आपली रूट्स शोधायला कधीतरी स्वीडन, कोरिया आणि भारत इथं माझी पुढची पिढी जाईल आणि आपलेपण जपतील. जशी माझी मुलं माझ्यावरच्या आणि त्यांच्या आजोबांवरच्या प्रेमानं भारतात इथवर आली.

माझा प्रवास संपला होता आणि माझ्या मुलांचा, नातवंडांचा प्रवास सुरू होणार होता.

***

# निसर्ग-वारी-अनोखी सुरवात!

**- प्राजक्ता पाडगांवकर** (अटलांटा, जॉर्जिया)



प्रत्येक जनसमूहाचे असे काही अलिखित नियम असतात, आणि ते मोडू पाहिले, की लोक गडबडतात, पेचात पडतात आणि काही जण पुढे येऊन त्या बदलाला कुतूहलाने सामोरे जातात! मी अमेरिकेत आले, तेव्हापासून मी इथल्या प्रत्येक शहरातल्या भारतीय आणि मराठी समूहाचे खूप जवळून निरीक्षण करत आहे, आणि मला जाणवले, की इथे जी भाषिक मंडळं आहेत त्यांचे स्वतःचे असे काही निकष आहेत, संस्कृतीतले कोणते तुकडे इथे घेऊन यायचे, त्यांचे प्रदर्शन करायचे आणि किती पुढल्या पिढीला सुपूर्त करायचे. गेली अनेक वर्षे ह्यावर कोणी काही फेरबदल केल्याचे दिसत नव्हते, अर्थात अपवाद निश्चित असणार, ह्याची खात्री आहे!

फक्त मराठी संस्कृतीबद्दल विचार केला तर असे लक्षात आले, की गणपती, दिवाळी, संक्रात असे काही ठळक सण सोडले तर फारसे काही घडत नव्हते. सर्व वयोगटातील मराठी लोकांना सहभागी होता येईल, केवळ प्रेक्षक न राहता सर्वार्थाने मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी होता येईल असे कार्यक्रम फारसे दिसले नाहीत. जर इथे वाढणाऱ्या मराठी पिढीच्या दृष्टिकोनातून बघितले, तर असे जाणवले, की एवढे तोकडे आणि संदर्भहीन सण साजरा करणे कदाचित ह्या पिढीला तितकेसे भावणार नाही आणि भावले नाही तर ते सगळे ही मुलं पुढे नेणार नाहीत. घरातदेखील जो सांस्कृतिक ठेवा मिळतो ह्या पिढीला, तोदेखील पुष्कळ प्रमाणात सरमिसळ झालेला असाच आहे. भाषेची, खाद्यपदार्थांची आणि इतर सर्वच सांस्कृतिक संकेतांची सरमिसळ! अर्थात त्यातून निराळी समृद्धी पदरी पडते हे निश्चित. तरी वाटत राहिले, की काही निराळे तुकडे, संकल्पना मराठी संस्कृतीतून पुढे इथे आणायला हव्यात, इथल्या मातीतले ओलसर संदर्भ त्यावर लिंपायला हवेत आणि मगच त्याचे निराळे मडके तयार होऊ शकेल! असा सगळा विचार जरी झाला, तरी इथल्या मंडळांपर्यंत पोचायचे काही सरळ मार्ग दिसत नव्हते, त्यामुळे इतर असंख्य कल्पनानांसोबत ही कल्पनादेखील कुठे कोपऱ्यात पडून राहिली होती, मग कोविड आला आणि अवघ्या जगाचे संदर्भच बदलून गेले! सगळ्या जगण्याचे जिथे संदर्भ बदलू लागले, तिथे एक नवीन शक्यतांचे कुरणदेखील दिसू लागले! म्हणजे एखाद सण कसा साजरा व्हावा, लोकांनी एकत्र कसे यावे आणि आनंद कसा आणि कुठे शोधावा, ह्याचे संदर्भ बदलून गेले. आणि बातमी आली, साल २०२० रोजी ८०० वर्ष अव्याहत सुरू असलेली वारी महाराष्ट्रात नेहमीप्रमाणे न होता, प्रतीकात्मक स्वरूपात होईल. मनात रुखरुख होती, मात्र काहीच करू शकले नाही. साल २०२१ तसेच उजाडले आणि पुन्हा वारी चुकणार हे स्पष्ट होत गेले. मग मात्र त्या कोपऱ्यातल्या कल्पना पुढे आणून लख्ख घासून काढल्या, स्थानिक मराठी मंडळातदेखील फारसे नवे कार्यक्रम घडत नव्हते, विशेषतः प्रत्यक्ष भेटून करण्याचे कार्यक्रम. अशात वसंत व्याख्यानमाला नुकतीच यशस्वीरित्या राबविल्याने अटलांटा मराठी मंडळाचे विश्वस्त श्री मंदार वेंगुर्लेकर ह्यांनी नवीन संकल्पनेबाबत उत्सुकता दर्शवली. इथून निसर्ग-वारीचा अनोखा प्रवास सुरू झाला!

दरवर्षी लाखो वारकरी महाराष्ट्रात २५० किलोमीटर चालून जातात, त्या पांडुरंगाच्या चरणी माथा टेकतात आणि पुन्हा संसारात परतून येतात, अव्याहत हे चालू आहे! इथे इतके दूर राहून असे होऊ शकेल असे वाटत नव्हते मात्र कोविडने जी संधी दिली, त्यातून एक कल्पना आकारास आली!

ठरले! विठ्ठल हा जर चराचरात आहे, असे संत म्हणून गेले आहेत, तर मंदिरातल्या प्रतिमेचा अट्टाहास कशाला? म्हणून मग पांडुरंगाचा शोध

निसर्गात घ्यायचे ठरले, मग हे निश्चित झाले की वारकरी २१ दिवसात २५०किलोमीटर चालत जातात, इथे अजून दहा दिवस घेऊ, म्हणजे ३१ दिवस ही वारी असेल हे ठरले! मग हे ठरले, की 'सीडीसी'चे नियम पाळून जर वारी करायची, तर मग ही असेल व्यक्तिगत यात्रा, एक नाविन्यपूर्ण वारी, प्रत्येकाची!

आपल्या घरात, घराजवळील बागा, सार्वजनिक पार्क असे कुठेही चालून, जर दररोज ५ मैल अंतर चालले तर १५५ मैल/२५० कि. मी. अंतर पूर्ण होऊ शकेल. अर्थात प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे, सवडीप्रमाणे कुठेही आणि थोडे कमी-जास्त चालले, तरी हरकत नव्हती, नियम एवढेच होते, की रोज चालायचे आणि मनात प्रसन्न भाव हवेत! वाटेत दिसणाऱ्या निसर्गात विठ्ठल शोधायचा! ह्याला छानसे कोंदण होते, गुगल स्प्रेडशीट्सचे, रोज त्यात स्वतःची प्रगती नोंदवून ठेवायची, एक व्हॉट्सअॅप ग्रुप केला होता, ई-मेल ग्रुप केला होता, ज्यावरून रोज मंडळी निसर्गातील सौंदर्याचे, देवाच्या सुरेख रूपाचे फोटो एकमेकांना पाठवत होते. कुठे कोणाला इवल्याश्या कासवात विठ्ठल दिसे, कधी गर्द हिरवाईत, कधी समुद्र-किनारी, कधी डोंगरदऱ्यात, कधी हरणं, ससे, काजवे असे काही दिसे, तर कधी आभाळाच्या मनहरी रंगातून विठ्ठल दिसत राही! मंडळी ऊन, पाऊस, वारा, कसलीच तमा न बाळगता चालू लागली! एका खास वेबपेजवरून, ई-मेल आणि व्हॉट्सअॅपवरून रोज एक विचार करायला लावणारे, प्रसन्न करणारे निरूपण, आमच्या अटलांटाचे अभय गोखले काका देत होते. तसेच अटलांटाचे राजा फाटक काका ह्यांनी त्यांच्या वडिलांच्या, श्री राम फाटकांच्या, आणि त्यांच्या स्वतःच्या सुरेल अशा अभंग रचना, आम्हाला उपलब्ध करून दिल्या! त्यामुळे इथल्या निसर्ग वारकऱ्याला रोज एक नवा अभंग आणि एक नवे निरूपण ऐकायला मिळे! त्याचबरोबर स्पॉटिफाय आणि जिओ सावन ह्या संगीत अॅपवरून २ प्लेलिस्टदेखील दिल्या, ज्यात साधारण १ तास ४० मिनिटे पुरेल इतके अभंग आणि संतरचना घातल्या होत्या, जेणेकरून ५ मैल अंतर चालताना सोबत सतत टाळ मृदुंग असेल! अशा प्रकारे निसर्ग-वारी वारकऱ्यांसाठी सज्ज केली, माणसे मजल दर-मजल चालत होती, निसर्गात रमत होती आणि भक्तिरसात न्हाऊन निघत होती! डोंगरमाथे, नद्या ओहोळ, धबधबे, सागर-किनारे, सौंदर्याने नटलेला हा देश, अनेक भारतीयांची कर्मभूमी, ही अमेरिकादेखील आपसूक गुंफली गेली ह्या वारीत! स्वतः जाड/बारीक होण्याच्या धसक्याने चालणे निराळे आणि हे असे स्वच्छंद, मुक्त निसर्गात देवत्व शोधत चालणे निराळे, हे सगळ्यांना आवडू लागले! करत करत ३० दिवस सरले आणि शेवटच्या दिवशी, सगळे वारकरी, जवळच्या कृष्ण-मंदिरात भेटले, तिथे स्थानिक ब्लूबेरीची ४० झाडे त्या दिवशी सगळ्या वारकऱ्यांनी मिळून लावली, शेवटचे एक मैल अंतर एकत्रित टाळ मृदुंगाच्या साथीने, डोक्यावर तुळस, हातात पांडुरंगाची प्रतिमा आणि मुखी विठूनामाचा गजर करत, पूर्ण केलं! आदल्या दिवशी समस्त ज्येष्ठ मंडळींनी मिळून सर्वांना पुरेल एवढ्या साबुदाण्याच्या खिचडीची सोय केली होतीच! त्यामुळे शेवटच्या दिवशी एक मैल चालून आलेल्या प्रत्येक वारकऱ्याला, ऊन ऊन खिचडी, केळे आणि राजगिरा वडीचा प्रसाद मिळाला, आणि सोबत एक तुळशीची माळ आणि तुळशीचे रोपदेखील मिळाले! शंभराहून अधिक निसर्ग वारकरी पहिल्याच वर्षी ह्या अनोख्या वारीत सहभागी झाले होते! आमचा सगळ्यात ज्येष्ठ वारकरी नव्वदीत अन् सगळ्यात लहान होता, तीन महिने वयाचा! दहाहजाराहून अधिक मैल अंतर सगळ्यांनी मिळून पूर्ण केलं, काहीजण चालत होते, काही धावत होते तर काही चक्क सायकलने ते अंतर कापत होते! ध्यास एकच, निसर्गातल्या पांडुरंगाला जाणायचे, त्याचा आदर, निसर्गाचा आदर करायचा आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येक निस्सीम भक्तीत रमलेल्या वारकऱ्यांना आश्वस्त करायचे की, "तुमची पाऊले थांबली तरी आम्ही चालत आहोत, पांडुरंगाची कृपादृष्टी आपल्या सगळ्यांवर सदैव राहो!"

हा सगळा सोहळा मी कल्पनेत पाहिला असला तरी त्याचे प्रत्यक्ष आयोजन मी एकटीने करणे शक्य नव्हतेच! महाराष्ट्र मंडळ अटलांटाचे मंदार वेंगुर्लेकर, सोबत नितीन खडसे आणि सगळीच ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळी होती म्हणूनच हे संपूर्ण कार्य विनासायास पार पडले! त्यानिमित्ताने संपूर्ण मराठी, अमराठी वर्तुळात उत्साह संचारला, धर्म, पंथ सोडून, ज्यांनी ज्यांनी वारी लहानपणी बघितली होती, अथवा ही संकल्पना आवडली, ते सगळे उत्साहाने ह्यात सामील झाले. प्रत्येकजण हक्काने मदत करत होते आणि दररोज चालत होते!

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अंतर्गत मराठी मंडळांपर्यंत ही बातमी पोचताच, कॅन्सस सिटीच्या सीमाताई लोकरे उत्साहाने ह्या अनोख्या निसर्ग-वारीत सामील झाल्या, तेथील अवघी मित्र-मंडळींची फौज घेऊनच! इतर अनेक मित्रमंडळी भारतातून आणि इतर देशातूनदेखील सहभागी झाली! माझे मार्गदर्शक आणि स्नेही राहुल करूरकर ह्यांनी ह्यावर एक पोस्ट फेसबुकवर टाकली तर ती प्रचंड व्हायरल झाली, आणि मग जगभरातून मंडळी चालू लागली, फेसबुकवर मला सांगू लागली, किती चालत आहेत ते! एक नुसता विचार, काही बदल घडवण्याचा, त्याचे असे इतके विराटरूप दर्शन मला काही दिवसात घडेल, ह्याची मलादेखील अजिबात कल्पना नव्हती! मात्र हा संपूर्ण सोहळा घडला खरा हातून! आणि आता इतर अनेक मराठी मंडळांतून अशी अनोखी निसर्ग वारी पुढल्या वर्षीपासून सुरू व्हावी, अशी इच्छा मनात ठेऊन केलेला हा सगळा लेखनप्रपंच!

***

## बृहन्महाराष्ट्र वृत्त पुरवणी सप्टेंबर २०२१
### ई विभाग - (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

**अमेरिकेतल्या गणेश चतुर्थीची धामधूम:- अस्मिता मोडक**
(शार्लट, नॉर्थ कॅरोलायना)

**- उत्तररंग सत्र :** - निरोगी दात, निरोगी हास्य,
- चार व्यक्तींचे चार आगळेवेगळे प्रवासानुभव

अहवाल लेखन- **स्मिता कंटक** (विल्मिंग्टन, डेलावेअर),
**अजित नातू** ( फोल्सम कॅलिफोर्निया)

**For Kids:- Game: CATCH 3- Rajiv Tambe** (Pune)

**वाचण्यासाठी संकेतस्थळ:-**

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

**Or Direct Link: Click:- Here**

**- BMM Yuva-Vani:- September 2021 Click:**

**https://bmmonline.org/yuva-vani-archives/**

**Or Direct Link: Click:- Here**

**- राशिभविष्य:- सप्टेंबर २०२१ - दादा दामले** (न्यू जर्सी)

**Click:-https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

# उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

बृ . म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी संपर्क:
**संदीप दीक्षित** बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व
**फोन क्र.** 1-216-926-6696 **ईमेल** sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी** - अध्यक्षा, बृ. म. मंडळ
**फोन क्र.** 1-224-321-2948 ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

...........................................................................

- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृ. म. मंडळ)



बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बीएमएम) उत्तररंगने गेल्या दोन वर्षांत ६१ यशस्वी कार्यक्रम दिले. बीएमएम उत्तररंगची टीम आपल्या सर्व प्रेक्षकांचे या कार्यक्रमांत सक्रीय सहभागी झाल्याबद्दल मनापासून आभार मानू इच्छिते. आमच्या सर्व आगामी कार्यक्रमांमध्येही अशाच समर्थ पाठिंब्याची अपेक्षा आहे. बीएमएम टीमच्या सदस्यांना काय म्हणायचे होते ते येथे आहे...

"रंगांचा उघडूनिया पंखा सांज कुणी ही केली
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेली.... "

संध्याकाळचे इतके सुंदर वर्णन पाडगावकरच करू जाणे. आयुष्याची सांजवेळही अशीच अनुभवांच्या अनेक रंगांनी खुललेली. आयुष्यातील कर्तव्ये आणि जबाबदऱ्यांतून मोकळे होऊन कृतार्थपणे ऊनपावसाच्या आठवणीत रमून जाण्याचा हा काळ. ही रम्य संध्याकाळ अधिकच सुंदर व्हावी, त्यात अधिक रंगांची भर पडावी, म्हणून येथील मराठी ज्येष्ठ नागरिकांसाठी 'उत्तररंग' हा उपक्रम २००७ साली विद्याताई सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाला. आताच्या २०१९-२०२२च्या समितीने अनेक स्वयंसेवकांच्या मदतीने आणि उत्तररंग समन्वयक संदीप दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अजून पुढे नेला आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून अध्यात्म, प्रवास, आरोग्य, राजकारण, कला, संगीत अशा अनेक विषयांवरची व्याख्याने, चर्चासत्रे, स्पर्धा, उत्सव आयोजित केले जातात. आतापर्यंत १०+ मंडळे बीएमएमच्या या उपक्रमाशी संलग्न आहेत आणि अनेक संलग्नित होण्याच्या मार्गावर आहेत. या उपक्रमाला सर्वांचा भरभरून प्रतिसाद मिळतो आहे. साधारण पन्नाशीच्या वरच असलेले आपले सदस्य जेव्हा उत्साहात यातील अनेक उपक्रमात सहभागी होतात, तेव्हा 'Age is just a number' या वचनाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. खरंच,आनंदाला वय नसतं. आयुष्याच्या पुस्तकाचं उलटणारं प्रत्येक पान रंगांच्या अनेक शक्यता घेऊन येत असतं. ते कोणत्या रंगात रंगवायचं हे आपणच ठरवायचं. अशावेळी 'उत्तररंग' सारखं मैत्र सोबत असेल तर मनात, ' या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे ...' हेच शब्द उमटतील.

धन्यवाद!

***

- **संदीप दिक्षित** (बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य व उत्तररंग नेतृत्व)



बी एम् एम् उत्तररंग प्रकल्पाचा ६१ वा कार्यक्रम organic आणि sustainable या मंत्राचा जप करत उत्साहाने पार पडला.

दर आठवड्याला एक अशा वेगाने व अतिशय शिस्तबद्ध कार्यपद्धतीने बी एम् एम् उत्तररंगची ही सर्व सत्रे आयोजित केली जातात. निरपेक्ष काम करणाऱ्या २४ जणांच्या माझ्या बी एम् एम् उत्तररंग स्वयंसेवक समितीचे हे यश आहे. तेवढाच मोठा वाटा दर शनिवारी उत्साहाने भाग घेउन भरघोस प्रतिसाद देणाऱ्या माझ्या उत्तररंगीय बंधुभगिनींचा आहे.

I'm truly blessed for this amazing fellowship and to receive blessings from our उत्तररंग कुटुंब of उत्तर अमेरिका. आम्ही या प्रकल्पाचा अधिकाधिक विस्तार करत राहणारच, हे नक्की ! धन्यवाद!

...

टीप:- उत्तररंग विभागाने आयोजित काही सत्र- अहवाल बृहन्महाराष्ट्र वृत्त पुरवणी ई विभागात समाविष्ट केला आहे. संकेतस्थळ: **https://bmmonline.org/vrutta-supplements/**

***

**Business/Residence for Lease:**

**A fantastic below market price leasing opportunity**
in the prime location of Kothrud, Pune, India
Near Mayur colony
and
at a walkable distance to metro-rail station.

*Two units available*, 1100-1200 SF each.
Will be built (estimate 1.5-2 years) upon agreement for Business or Residence

(Flat will be 3 bedrooms, 3 baths, 3 balconies, 2 car parking spaces);

Rs.1.5 crore/unit (negotiable)
with a 50-year Lease.

**Contact:**

**978-987-5602 (Boston, MA)**
Or
**9175608329 / 9765795654 (Pune, India)**

# Charity giving to any entity in India is now easy
## with
## Foundation for Small Charities India, Inc. (FSCI)
## Granted by IRS
## A (501 (C)(3) Tax Exempt Status.

**An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape.**

**India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.**
**FSC is the answer.**
**For more detail.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org"**
**Or**
**Email to Admin@SmallCharity.Org**
**You will hear from:**
**Ramesh Sarva, CPA, 183 S. Broadway,#210, Hicksville NY 11801**
**Cell: 347-232-8668**
**Join Donor List:**

| | |
|---|---|
| SUHASINI JOSHI | COSMIC BEATS |
| KAMALAKAR PENDSE | ATHASHREE |
| KISHOR DANDEKAR | AMPTE FOUNDATION |
| KIRAN NANDINI JOAG | V.T. PATIL FOUNDATION |
| MUKUND SHAILA DIDOLKAR | EDUCATIONAL FOUNDATION |
| SUBHASH SUHASINI PURANIK | CASP, PATHAK TRUST |
| RAHUL PUNAM MUTHA | ANAND RISHI HOSPITAL- AHMADNAGAR MH |
| KASI& GEETHA GABBITA | NIH, INDIA |
| ANDREW LEDERER | BUILDASCHOOLININDIA.COM |
| JAGDISH & SHUBHANGI THAKUR | MADHAV NAGARKAR, SWAROOP YOG |
| KOTESWARA RAO KUNDA MD | GUNTUR AP EDUCATIONAL FOUNDATION |

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
3574 S. Marion Way
Chandler, AZ 85286

गणपतीसाठी माव्याचे मोदक, दसऱ्यासाठी पुरणाची पोळी आणि दिवाळीसाठी फराळ यासाठी अमेरिकेतील लोकप्रिय नाव
रानडे फूड्स, ऑडिओ, पुस्तके व गिफ्ट्स
कॅटलॉगसाठी या क्रमांकावर whatsapp मेसेज पाठवा +१ २६७ ९८१ ७१७०

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या ह्यूस्टन ते डॅलस अधिवेशनातील कार्यक्रम ऑडिओ आणि व्हिडिओवर
कॅटलॉगसाठी या क्रमांकावर whatsapp मेसेज पाठवा +१ २६७ ९८१ ७१७०

HEALTH INSURANCE

INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR

* VISITORS
* H-1 B VISA HOLDERS
* PERMANENT RESIDENTS
( Some restrictions apply)

For more information:

Contact: Padmaja Bapat
Independent Insurance Agent

616 Rhodes Hill Court
Martinez, GA 30907

Tel: 888 705 8271
E-mail: padmaja.p.bapat@gmail.com
Website: visitors-insurance.com